# नुतनीकरण प्रमाणपत्र

वाचा :-

१. मुख्याध्यापक, **किलबिल नॅशनल स्कुल (इंग्रजी माध्यम) जवळगा ता. अहमदपूर जि. लातूर** यांचा प्रस्ताव दि. २०/०६/२०२२
२. मुख्याध्यापक यांनी यापुर्वी दिलेल्या मान्यता, तपासणी अहवाल व इतर पुरावे सादर केलेली आहेत.
३. गटशिक्षणाधिकारी यांचा तपासणी अहवाल
४. या कार्यालयाची मान्य टिपणी दिनांक / /२०२२

| | | |
|---|---|---|
| **ग्राम** | **:-** | **जवळगा ता. अहमदपूर जि. लातूर** |
| **दुरध्वनी (संस्थेचा / शाळेचा)** | **:-** | |
| **ईमेल (संस्थेचा / शाळेचा)** | **:-** | **-** |

**जावक क्र. :- क्र.२०२२/जिपला/शिविप्रा/कार्या- १३/सीआर-/कावि-** 615 **जि.प.लातूर दि.** 21/6 **/२०२२.**

| | | |
|---|---|---|
| **जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय,** | **:-** | **जिल्हा परिषद, लातूर** |
| **(जिल्हा / राज्य यांचे नाव )** | **:-** | **महाराष्ट्र.** |
| **क्रमांक** | **:-** | **२७२८०९१११७०२ दिनांक :-** |
| **व्यवस्थापक (संस्थेचे नाव)** | **:-** | **राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, लक्कड जवळगा ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर** |
| **माध्यम** | **:-** | **इंग्रजी** |

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत..**

आपला दिनांक२०/०६/२०२२ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार /शाळेची केलेली तपासणी या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद लातूर, शैक्षणिक वर्ष **दि. ०१/०४/२०२२ पासून दि. ३१/०३/२०२५** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता १ वी ते ८ वी** करीता:- **किलबिल नॅशनल स्कुल (इंग्रजी माध्यम) जवळगा ता. अहमदपूर जि. लातूर** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधिन आहे :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नाता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहील्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्यांच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्वी मिळेल, अशी परीपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येतील.
५. संस्था / शाळा कोणतीही कॅपीटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाणणी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उतीर्ण होण आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदिनुसार समावेश करण्यात येईल.
(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतू आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान ०५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

Scanned with OKEN Scanner

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विर्निदिष्ट केलेली त्याची / तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतात आणि,

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या अधारे तयार केलेल्या पाठयक्रमाची पालन करेन.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विर्निर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - ८२०० चौ. मी.
- एकुण बांधकाम क्षेत्र - ४९२० चौ. मी.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ - ३२८० चौ. मी.
- वर्ग खोल्यांची संख्या -३०
- कार्यालय - नि- भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली -०६
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदाची स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल - होय.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा - होय.
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वंयपाकघर - आवश्यकता नाही
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता - होय.
- वाचन साहीत्य विनासायास उपलब्ध - होय.

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्या येतील

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा, कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेख विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक **२७२८०९१११७०२** असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

**टिप :- १ ते १० मानके पुर्ण करण्याच्या अटीवर बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक मुख्याध्यापक यांनी दिलेल्या पुराव्याच्या आधारे शाळांना आरटीई मान्यता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.**

(वंदना फुटाणे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, लातूर

Manager
Kilbil National School,
Jawalga Tq.Ahmedpur Dist.Latur

Principal
Kilbil National School,
Affiliation No.1131205 School Code : 31192
Jawalga Tq.Ahmedpur Dist.Latur

Scanned with OKEN Scanner